# Amazon पुरवठा श्रृंखला मानके

Amazon मध्ये आम्ही ह्या बाबतींत कटिबद्ध आहोत की आम्ही जे-जे जिन्नस किंवा ज्या-ज्या सेवा प्रदत्त करतो ते करीत असतांना मानवाधिकारांचा आणि पर्यावरणाचा आदर कायम ठेऊन कामगारांच्या गरिमेचे पूर्ण रक्षण होईल. आम्ही फक्त अश्याच पुरवठेदारांशी व्यवहार ठेवतो जे ह्या मूल्यांविषयी तितकेच वचनबद्ध असतात आणि आमच्या पुरवठेदारांसाठी व आमच्या पोटभागीदार कंपन्यांकरता आम्हीं ह्या बाबतीत अत्यंत कडक अशी मानके निश्चित करतो. संयुक्त राष्ट्रा तर्फे व्यापार आणि मानवाधिकारांच्या संदर्भात सुनिश्चित केल्या गेलेल्या मानकांना, अंतरराष्ट्रीय श्रमिक संस्थे - म्हणजेच ILO - ने त्यांच्या प्राथमिक आणि मूलतः सुनिश्चित केलेल्या परंपरेला ज्यात ILO ने सुनिश्चित केलेल्या पायाभूत तत्वांचा आणि कामावर असतानाच्या अधिकारांचा समावेश आहे, व तसेच संयुक्त राष्ट्राने मानवाधिकारांबद्दल च्या घोषित धोरणाला अनुसरूनंच आम्ही आमची मानके ठरवली आणि अंगिकारली आहेत.

ऍमेझॉन स्टोर्स मधे विकले जाणारे किंवा ऍमेझॉन ला पुरवले जाणारे जिन्नस हे पुरवठादारां साठी आम्ही नेमलेल्या ह्या मानकांशी वा आचारसंहितेशी संगनमत आणि निष्ठावंत राहूनच उत्पादित वा तैयार केले जावेत ही अपेक्षा ऍमेझॉन बाळगते. जरी असे आढळून आले की आम्ही ठरवलेली आणि नेमलेली आचारसंहिता त्यासंबंधीच्या लागू असलेल्या कायद्यांपेक्षाही जास्तं कडक आहे तरी आम्हाला जिन्नस किंवा सेवांचा पुरवठा करतांना आम्ही अशी अपेक्षा बाळगतो की आमच्या पुरवठेदारांनी ह्या आचारसंहितेचे पूर्ण अनुपालन करावे.

ही मानके क्रियान्वयित करतांना आम्ही खालील मुख्य तत्वे किंवा धोरणे पाळतो:

1. **समावेशकपणा :** आम्ही आमची नेमलेली मानके वंश, वर्ण, रंग, जाति, जमात, लिंग, लैंगिक सादरीकरण, लैंगिक आवड, मूळ नागरिकता, धर्म वा धार्मिक पूर्वाग्रह, वय, दिव्यांगता वा अपंगत्व, गर्भारपण, राजकीय मत, स्थलांतरित वा विमुक्त जाति चे असणे किंवा नसणे, वैवाहिक अथवा पारिवारिक स्थिती इत्यादी अश्या वैयक्तिक चारित्यदर्शी किंवा वैशिष्ट्यदर्शी स्वभाव-धर्मांना न जुमानता सर्वांवर एक सारखी आणि एकाच मापदंडाने लागू करतो. आम्हाला ही जाणीव आहे की पुरवठादारांसाठी आम्ही नेमलेल्या धोरणांमुळे ह्या वेगवेगळ्या गटातील व्यक्तींवर यदाकदाचित प्रमाणाबाहेर दुष्परिणाम होऊ शकतो आणि त्यांचे गैर-शोषण होण्याची शक्यताही कदाचित वाढते. जर कधी अश्या काही परिस्थिती घडून आल्या की ज्यात पुरवठेदारांसाठी आम्ही अंगिकारलेल्या धोरणांपलीकडे एखादी अशी बाब घडून आली व त्यासंदर्भात असे लक्षात आले की ह्यामुळे विशेषेकरून ह्या गटांमधल्या व्यक्तींसंबंधात काही धोका वा जोखीम निर्माण झालीए किंवा होऊ शकते तर आम्ही आमच्या पुरवठेदारांसोबत मिळून ह्या विषयी चर्चा व विचार-विनिमय करू आणि योग्य ती पाऊले उचलू.

2. **सतत सुधारणा:** ऍमेझॉन सतत सुधारणा घडवण्याचे धोरण आळवते आणि आम्ही आमच्या पुरवठेदारांसोबत मिळून त्यांच्या कामगारांची व त्यांच्या कामाच्या ठिकाणांची सुरक्षा कशी आणखीन वाढवता येईल ह्याबद्दल कटिबद्ध आहोत. आमचा एखादा पुरवठेदार आमच्या आचारसंहितेचे पालन करण्यास कमी पडला तर त्याचेबरोबरचे आमचे संबंध तोडण्याचे अधिकार आम्हाला आहेत ह्याची पूर्ण जाणीव आम्हाला असून आम्ही नेहमीच कामगारांचे हीत सर्वोपरी लेखतो. जर एखादा पुरवठेदार मूल्यांकनाच्या प्रक्रियेत सहकार्य करत नसेल, किंवा त्याची एखादी आचारसंहितेबाह्य ठरलेली वागणूक वा एखादा व्यवहार बदलायला तयार होत नसेल किंवा हवी ती दुरुस्ती लागू करण्यास किंवा प्रगती दाखवण्यास हद्दीपलीकडे विलंब लावीत असेल किंवा खोटारडेपणा करीत असेल किंवा चुकीचे भाष्य करीत दाखल्यांचे भलते अर्थ लावून दिशाभूल करीत असेल किंवा असले इतर बेकायदेशीर आणि फसवणुकीचे व्यवहार करीत असेल तर त्या पुरवठेदाराशी संबंध-विच्छेद या पर्यायाकडे आम्ही गंभीरपणे पाहतो.

3. **पुरवठा शृंखलेची जवाबदारी:** आम्ही अंगिकारलेल्या मानकांचे संपूर्ण पुरवठा शृंखलेत पालन व्हावे हे उद्दिष्ट्य गाठण्यासाठी आम्ही आमच्या पुरवठेदारांकडून अशी अपेक्षा करतो की त्यांनी पण त्यांच्या पुरवठा शृंखलेत ही मानके पूर्णपणे पाळली जाताहेत ह्याचे वेळोवेळी निरीक्षण-परीक्षण करावे आणि ह्या मानकांची नीट अंमलबजावणी होतेय ह्याची दक्षता घ्यावी व ह्यात सुधारणा करत राहाव्यात जेणेकरून ह्या पुरवठ्याकर्त्यांसंबंधीच्या आमच्या धोरणांनांमार्फत जाहीर केलेल्या आमच्याच नव्हेत तर आमच्या ग्राहकांच्या ही अपेक्षा पूर्ण होतील किंवा ह्याबाबतीतल्या अपेक्षांचे अनुपालन कदाचित जास्तच दर्जाचे होईल. तशी विचारपूस झाली असता आमच्या पुरवठेदारांना त्यांचे पोट-कंत्राटदार किंवा कामगार एजन्ट याबद्दल माहिती पुरवणे बाध्य आहे. ह्या पोट-कंत्राटदार किंवा कामगार एजन्ट यांकडून सुद्धा अंगिकारलेल्या मानकांचे, आचारसंहितेचे आणि व्यवहारांचे काटेकोरपणे पालन होत आहे अथवा नाहीं ह्याबद्दल पुरवठेदारांनी पोट-कंत्राटदार व कामगार एजन्ट यांना जवाबदार ठरवावे. जे पुरवठेदार पुरवठा शृंखलेत वेगवेगळ्या उत्पादकांकडून उत्पादन करून घेतात त्यांनी त्यांच्या कंत्राटदारांबरोबर काम करून ह्या मानकांचे पालन होतंय ह्याची खात्री करून घ्यावी आणि त्यांना ह्या संबंधी हवी तशी जागरूकता द्यावी. . आमच्या असे लक्षात आले आहे की पुरवठा श्रृंखलेतील खालच्या स्तरात काम करणाऱ्या आणि अनौपचारिक क्षेत्रांमध्ये (informal sectors) काम करणाऱ्या पुरवठादारांना या मानकांनुसार काम करण्यास जास्त वेळ लागू शकतो. पुरवठादारांना आमची धोरणे समजण्यात मदत करण्यासाठी आम्ही त्यांच्यासोबत काम करण्यासाठी वचनबद्ध आहोत. आम्ही पुरवठा कोडच्या सर्व लागू मुद्द्यांची पूर्तता करण्याची अपेक्षा करतो, तेव्हा या आवश्यकतांची अंमलबजावणी करत असताना पुरवठादारांची संख्या आणि रचनेचा (उदा. फॅमिली फार्म, स्मॉलहोल्डर, होमवर्कर) विचार केला जाईल.

## पुरवठादार आचारसंहिता

नॅव्हिगेट करण्यासाठी क्लिक करा:

कामगाराचे हक्क | आरोग्य आणि सुरक्षितता | पर्यावरण | झुंजी खनिजे आणि जमीन अधिकार | नैतिक वागणूक | व्यवस्थापन सिस्टम

### कामगाराचे हक्क

**1. युवा कामगार.** Amazon ला बाल कामगाराचा वापर मुळीच मान्य नाही. पुरवठादारांनी अशा कर्मचाऱ्यांनाच कामावर ठेवणे बाध्य आहे जे ह्या पैकी जास्त असेल: (i) 15 वर्षांचे आहेत, (ii) अनिवार्य शिक्षण पूर्ण करण्याचे वय पूर्ण झालेले आहे किंवा (iii) ज्या देशात काम करायचे आहे तेथील किमान वय, याव्यतिरिक्त , १८ वर्षाखालील कामगारांना (युवा कामगार) अशी धोकादायक कामे वर्ज्य आहेत ज्यात त्यांच्या आरोग्य किंवा सुरक्षेला धोका असेल किंवा त्यांच्या शिक्षणाशी संबंधित कोणताही तडजोड होईल (उदा., रात्रपाळी, ओव्हरटाइम).

**हलके काम:** आंतरराष्ट्रीय कामगार मानकांनुसार, हलके धोकादायक नसलेले काम निवडक परिस्थितींमध्ये त्यांचे शिक्षण, आरोग्य, शाळा किंवा वैयक्तिक आणि शारीरिक विकासाला धोका न पोहोचवता त्यांच्या पालकांना किंवा नातेवाईकांना मदत करण्याची मुलांना परवानगी आहे. सर्व परिस्थितींमध्ये, पुरवठादारांनी बाल कामगार कायद्यांचे आणि आंतरराष्ट्रीय कामगार मानकांचे पालन करायलाच हवे.

**2. विद्यार्थी कर्मचारी.** Amazon कामाच्या ठिकाणी कायदेशीर बसण्यार्या अश्या शिकाऊ कार्यक्रमांच्या विकासाला समर्थन देते जे विद्यार्थ्यांची शैक्षणिक उद्दिष्टांना पोषक असेल, आणि Amazon च्या पुरवठादार संहितेचे आणि लागू स्थानिक कायद्यांचे पालन करेल. पुरवठादारांनी विद्यार्थ्याचे रेकॉर्ड, शैक्षणिक भागीदारांची कडक चाचणी आणि लागू कायदा आणि नियमनांनुसार विद्यार्थ्याच्या हक्कांचे संरक्षण यांचे व्यवस्थित पालन करून विद्यार्थी कर्मचाऱ्यांच्या काळजीपूर्वक व्यवस्थापनाची खात्री करण्याची आवश्यकता आहे. स्थानिक कायद्याच्या अनुपस्थितीत, विद्यार्थी कर्मचारी, इंटर्न आणि शिकाऊ उमेदवाराचा मजुरी दर प्रविष्टी-स्तरावरील कर्मचाऱ्यांप्रमाणे किंवा तेच काम करत असलेल्या अन्य किमान मजुरी दराइतका असायला हवा. उमेदवारी प्रोग्राम मर्यादित कालावधीसाठी असायला हवा किंवा प्रोग्राम पूर्ण झाल्यावर नियमित रोजगारीचा एंट्री पॉइंट समझला जावा.

**3. अनैच्छिक कामगार, मानवी तस्करी आणि गुलामगिरी.** Amazon पुरवठादारांनी जबरदस्तीने - गुलाम, तुरुंग, करारबद्ध, बंधित (बांधील) किंवा अन्यथा - मजूर वापरू नयेत. जे कर्मचाऱ्यांची तस्करी करतात किंवा धमकी, शक्ती, जबरदस्ती, अपहरण किंवा फसवणुकीसारख्या अन्य मार्गांनी कर्मचाऱ्यांचे शोषण करतात Amazon अशा पुरवठादारांना सहन करत नाही. सर्व काम ऐच्छिक असायला हवे आणि कर्मचाऱ्यांना कधीही काम सोडून जाण्याची आणि नोकरी सोडण्याची किंवा पुरेशी नोटिस देऊन कामाचा दर्जा बदलण्याची मुभा असावी. कामगारांना नोकरीसाठी भरती होण्याकरिता, नोकरी-एजंट्स किंवा दलालांची फी किंवा इतर संबंधित फी त्यांच्या मूळ देशात किंवा ज्या देशात काम केले जाणार आहे अशा देशात भरण्याची आवश्यकता नसावी. कामगारांनी कोणत्याही वेळी भरती होण्याकरिता फी दिली असल्यास पुरवठादारांनी तो शुल्क भरायला हवा, किंवा भरती प्रक्रियेदरम्यान कोणत्याही क्षणी घेतलेल्या फीची भरपाई करणे किंवा भरून देणे पुरवठादारांना आवश्यक आहे जरी अशीभरती पुरवठादारांच्या थेट नियंत्रणाबाहेर असली तरी कर्मचाऱ्यांनी भरलेल्या सर्व फी आणि खर्चाची नोंद Amazon कडे व्हायला हवी आणि नोकरी किंवा काम सुरु व्हायच्या अगोदर कर्मचाऱ्यांच्या स्थानिक भाषेत त्यांना तसे कळवायला हवे.

Amazon आमच्या पुरवठादारांकडून त्यांच्या तृतीय-पक्षीय कामगार एजंट किंवा दलालांकडून आमच्या पुरवठादार कोडदवारे कव्हर केलेल्या मानकांचे आणि पद्धतींचे अनुपालन करत असल्याची देखील अपेक्षा करते. पुरवठादारांनी भरती एजंसी आणि कामगार दलाल व रोजगार एजंसींच्या पद्धतींचे विश्लेषण व निरीक्षण करणे आवश्यक आहे, आणि अश्याच एजन्सीना नेमावे ज्या कामगारकरार करताना नैतिकतेने आणि कामगारांच्या हितासाठी कार्य करतील. पुरवठादारांनी खात्री करायला हवी की स्टाफिंग किंवा भरती एजन्सी आमच्या पुरवठादार कोडचे अनुपालन करतात, तसेच काम केल्या जात असलेल्या आणि कर्मचाऱ्याच्या मूळ देशातील सर्व लागू कायद्यांचे पालन करतात.

पुरवठादारांनी कर्मचाऱ्यांना कामाची अट म्हणून शासनाने जारी केलेले ओळख पत्र, पासपोर्ट किंवा कामाचे परमिट त्यांच्या स्वाधीन करण्यासाठी बाध्य करू नये. पुरवठादारांनी असे दस्तऐवज कायदेशीर प्रशासकीय आणि इमिग्रेशन करण्याच्या प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी तात्पुरते स्वतःकडे ठेवण्यास हरकत नाही. कामगारांना स्पष्ट, समजतील असे दस्तऐवज दिले जाणे आवश्यक आहे, ज्यात त्यांच्या प्रतिबद्धतेच्या अटी आणि शर्ती त्यांना समजत असलेल्या भाषेत आणि कामगारांना समजेल अशा पद्धतीने देणे आवश्यक आहे.

**4. स्थलांतरित कामगार:** Amazon आमच्या पुरवठादारांकडून देशी-परदेशी दोन्ही प्रकारच्या शोषण होण्याच्या जोखमींकडे विशेष लक्ष देण्याची अपेक्षा करते आणि अश्या कामगारांमध्ये या मानकांच्या बाबतीत भेदभाव केला जाऊ नये याची काळजी घेण्याची अपेक्षा करते. आमचे पुरवठादार केवळ अश्याच कामगारांना नोकरी वर ठेवू शकतात, ज्यांना काम करण्याचा कायदेशीर हक्क आहे, किंवा असा कामगार निर्वासित लोकसंख्येशी निगडित मंजूर प्रोग्रामशी संबंधित असेल (अशा परिस्थितीत ॲमेझॉन या प्रकल्पांचे केस बाय केस आधारावर मूल्यांकन करेल). जर पुरवठादारांनी देशी किंवा परदेशी स्थलांतरित कामगारांना नोकरी वर ठेवले, तर अशा कामगारांबाबत ज्या देशात असे कामगार काम करणार आहेत त्या देशातल्या कामगार कायद्यांचे पूर्ण पालन केले पाहिजे. कामगार वाजवी किंवा कायदेशीररित्या लागू झालेल्या सूचनेनंतर दंड न देता स्वेच्छेने करार रद्द करण्यास सक्षम असणे आवश्यक आहे.

पुरवठादारांना सर्व कर्मचाऱ्यांची, विशेषत: स्थलांतरित कामगारांची, अद्ययावत नोंद ठेवणे आवश्यक आहे; यामध्ये मूलभूत कराराच्या अटी आणि कामगारांच्या आगमन आणि निघण्याची तारीख यांचा समावेश आहे.

**5. वेतन आणि फायदे.** पुरवठादारांना त्यांच्या कामगारांना वेळेवर पगार देणे आवश्यक आहे आणि पात्र असल्यास भरपाई (ओव्हरटाइमचा पगार आणि पात्र फायदे) लागू असलेल्या कायद्यांचे किमान पालन करीत देणे आवश्यक आहे. कामगारांना पगार ज्या आधारावर दिला जातो त्यांची जाण pay slip किंवा तत्सम दस्तऐवजा द्वारे वेळेवर दिले जाणे आवश्यक आहे. शिस्तीचा उपाय म्हणून वेतनातून कपात करण्याची परवानगी नाही. याव्यतिरिक्त, कामगारांच्या मूलभूत गरजा आणि त्यांच्या कुटुंबाच्या गरजा भागविण्यापुरते पैसे ते कमवतात की नाही याचे नियमितपणे मूल्यांकन करण्यास आम्ही आमच्या पुरवठादारांना प्रोत्साहन देतो.

**6. कामाचे तास.** कामगारांची सुरक्षा, आरोग्य आणि त्यांचे कल्याण सुनिश्चित करण्यासाठी कामाच्या तासांवर नियमितपणे लक्ष ठेवण्याची Amazon पुरवठादारांना कडून अपेक्षा करते. विशेष किंवा आपत्कालीन परिस्थिती असल्याशिवाय, पुरवठादारांना (1) कामाचे तास आठवड्याला 60 तासापर्यंत, ओव्हरटाईमसह, मर्यादित करणे आवश्यक आहे, आणि (2) प्रत्येक कामगाराला प्रत्येक सात दिवसांच्या कामाच्या कालावधीत किमान एक दिवस सुट्टी मिळण्याचा हक्क असणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत कामाचे तास कायद्यात तरतूद असलेल्या जास्तीत जास्त तासांपेक्षा पुढे जाऊ नयेत.

**7. भेदभाव न करण्याचे धोरण.** Amazon पुरवठादारांनी नोकरीवर घेताना, नोकरीसाठी अर्ज मागवताना अथवा चाळताना , पदोन्नती देते वेळी, कामाचे वाटप करताना, प्रशिक्षण, वेतन, फायदे आणि टर्मिनेशन करताना, वंश, रंग, राष्ट्रीय मूळ, लिंग, लिंग ओळख, लैंगिक प्रवृत्ती, धर्म, अपंगत्व, वय, राजकीय मत, गर्भधारणा, स्थलांतरित स्थिती, वांशिकता, जात, वैवाहिक किंवा कौटुंबिक स्थिती किंवा तत्सम वैयक्तिक आधारावर कुठलाही भेदभाव करू नये. पुरवठादारांनी अनिवार्य गर्भ चाचणी किंवा HIV (एचआयव्ही) चाचण्या करू नयेत. कामगार किंवा अर्जदारांना आवश्यक असलेल्या सर्व

वैद्यकीय चाचण्या भेदभावपूर्ण पद्धतीने रुजू केल्या जाऊ नयेत. पुरवठादारांनी वेगवेगळ्या धार्मिक पार्श्वभूमीच्या कामगारांसाठी वाजवी समायोजन करणे आवश्यक आहे, आणि स्त्री-पुरुष समानतेला प्रोत्साहन देणारे "समान संधी रोजगार धोरण" ठेवणे आवश्यक आहे. आम्ही आमच्या पुरवठादारांना प्रसूती रजा देण्यास प्रोत्साहित करतो.

**8. योग्य वागणूक.** सर्व कामगारांना आदर आणि सन्मानपूर्वक वागवले पाहिजे. हिंसा, शारीरिक शिक्षा, मानसिक छळ, लैंगिक छळ किंवा धमकी देऊन किंवा कामावर येण्यास किंवा रहिवाशी सुविधांवर अवाजवी निर्बंधासह शारीरिक किंवा शाब्दिक किंवा मानसिक अत्याचार किंवा जबरदस्तीचा आमच्या पुरवठादारांनी वापर करू नये. Amazon किंवा त्याच्या लेखा परीक्षकांकडे 'गोपनीय कामगार मुलाखती" घेऊन कामगारांना मुक्तपणे व्यक्त होता आले पाहिजे आणि पुरवठादार व्यवस्थापन बदला घेतील ही भीती न बाळगता ऑडिट प्रक्रियेत भाग घेण्याची कामगारांना मुभा असणे आवश्यक आहे. कामगारांना भेदभाव आणि छळ न करण्याचे प्रशिक्षण देण्यासाठी आम्ही पुरवठादारांना प्रोत्साहित करतो.

**9. सामील होण्याचे स्वातंत्र्य.** Amazon ला अशी अपेक्षा आहे की, आमच्या पुरवठादारांनी कामगारांना त्यांच्या आवडीची संस्था स्थापन करण्याचा आणि त्यामध्ये सामील होण्याच्या हक्काचा आदर करावा. अहिंसक वर्तन करीत कायदेशीर संस्थेत सामील होण्याच्या किंवा सामील न होण्याच्या त्यांच्या हक्काचा त्यांच्याद्वारे वापर केला गेल्यास कामगारांचा छळ केला जाऊ नये किंवा त्यांच्या वर दंड लावला जाऊ नये अशी Amazon ला अपेक्षा आहे.

## आरोग्य आणि सुरक्षितता

**1. आरोग्य आणि सुरक्षितता.** Amazon आमच्या पुरवठादारांकडून कामगारांना सुरक्षित आणि आरोग्यदायी कामाचे वातावरण देण्याची अपेक्षा ठेवते. पुरवठादारांनी कमीत कमी, कामाच्या परिस्थितीसंदर्भात आणि Amazon च्या पुरवठादार संहितेतील मानकां मध्ये दिलेल्या कायद्यांचे पालन करावे.

**2. व्यावसायिक सुरक्षा.** पुरवठादारांनी कामगारांच्या सुरक्षिततेच्या संबंधी धोक्यांच्या संपर्कात येण्याच्या संभाव्यतेवर लक्ष ठेवणे (उदा. रासायनिक, यांत्रिक, विद्युत आणि इतर ऊर्जा स्त्रोत, आग, वाहने आणि पडण्याचे धोके) आणि या धोक्यांची योग्य डिझाइन, अभियांत्रिकी आणि प्रशासकीय नियंत्रणे, प्रतिबंधात्मक देखभाल आणि सुरक्षित कार्य प्रक्रियेद्वारे (लॉकआउट/टॅगआउट सह), व अश्या संभाव्यतेची ओळख पटवणे, मूल्यांकन करणे आणि नियंत्रित करणे आणि सुरक्षा प्रशिक्षण चालू ठेवणे आवश्यक आहे. जेथे धोक्यांवर या मार्गांनी पुरेसे नियंत्रण ठेवता येत नाही असे दिसते तेथे कामगारांना योग्य, सुव्यवस्थित, वैयक्तिक संरक्षक उपकरणे प्रदान करणे आवश्यक आहे आणि प्रशिक्षण वेळेवर देणे आणि या धोक्यांपासून बचाव करण्याकरता दिलेल्या संबंधित उपकरणे आणि शैक्षणिक सामग्री चा योग्य वापर कसा करावा हे कार्यान्वित करणे पुरवठादारांना आवश्यक आहे. ज्या धोक्यांमुळे गर्भवती महिला आणि नर्सिंग मातांवर परिणाम होऊ शकतो असे धोके कमी करण्यासाठी आणि त्यांना कोणत्याही धोक्यांची माहिती देण्यासाठी वाजवी पावले उचलण्यासाठी आम्ही पुरवठादारांना प्रोत्साहित करतो.

**व्यावसायिक इजा आणि आजार:** पुरवठादारांनी अशा प्रक्रिया आणि सिस्टम बनवून ठेवाव्यात, ज्याने व्यावसायिक इजा आणि आजार होणार नाहीत वा झाल्यास त्यांचे व्यवस्थापन करणे आणि त्यांची नोंद ठेवणे सहज शक्य होईल; ह्या साठी कामगारांना रिपोर्टिंग करण्यास प्रोत्साहित करणे, अश्या बाबींचे वर्गीकरण करणे आणि त्यांची नोंद ठेवणे, आवश्यक वैद्यकीय उपचार प्रदान करणे, केसेस तपासणे आणि त्याची कारणे काढून टाकण्यासाठी सुधारात्मक क्रियांची अंमलबजावणी करावी.

**औद्योगिक स्वच्छता:** कामगारांचा रसायनियक, जैविक आणि भौतिक पदार्थांशी संपर्क होण्याच्या शक्यता ओळखणे वा टिपणे व ह्या बाबतीत त्याचे मूल्यांकन आणि नियंत्रण करण्यास आम्ही पुरवठादारांना प्रोत्साहित करतो. योग्यत्या डिझाईन, इंजिनीरिंग आणि प्रशासनिक नियंत्रणांद्वारे संभाव्य धोक्यांपासून बचाव किंवा अश्या धोक्यांचे निर्मूलन करणे ह्यांचा ह्यात समावेश आहे. धोकादायक परिस्थितीत किंवा पदार्थांशी काम करावे लागणार असल्यास (किंवा तशी परिस्थिती असण्याची शक्यता असल्यास) कामगारांना अग्रिम सूचना देणे व त्याबद्दल जरुरी ते प्रशिक्षण देणे बाध्य आहे. याव्यतिरिक्त, कामगारांना त्यांची - त्यांची व्यक्तिगत सुरक्षा उपकरणे देणे व ती वापरण्या संबंधी त्यांचे शिक्षण आणि प्रशिक्षण करणे बाध्य आहे.

**3. शारीरिक मेहनत असणारे काम.** पुरवठादारांनी कामगारांचे आरोग्य आणि सुरक्षा धोक्यात येणार नाही याची खात्री करण्यासाठी शारिरीक मेहनत करावी लागणारी कामे ओळखली पाहिजेत, त्याचे मूल्यांकन केले पाहिजे व त्यावर नियंत्रण ठेवले पाहिजे.

**4. आपत्कालीन तयारी आणि प्रतिसाद.** आपत्कालीन अहवाल, अलार्म सिस्टम, कामगारांना योग्य सूचना देणे, आपत्कालीन परिस्थितून बाहेर पडणे, कामगार प्रशिक्षण आणि कवायती, प्रथमोपचार पुरवठा, अग्निशामक शोध आणि निगडित उपकरणे आणि ब्लॉक न केलेले बाहेर पाडण्याचे मार्ग इत्यांदींचा समावेश करून पुरवठादारांना आपत्कालीन परिस्थिती ओळखणे आणि नियोजन करणे आणि त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे आणि त्यांच्या कामगारांना प्रतिसाद प्रणालीवर प्रशिक्षण देणे ही आवश्यक आहे.

**5. मशिनची सुरक्षा.** पुरवठादारांनी नियमित मशिनरी देखभाल कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे.. उत्पादन आणि इतर यंत्रांच्या सुरक्षिततेच्या दृष्टया धोक्यांचे नियमित मूल्यांकन केले जाणे आवश्यक आहे. कामगारांना मशिनरीमुळे दुखापत होण्याचा धोका असल्यास यथायोग्य मशिनरी नियंत्रणे (उदा., फिजिकल गार्ड, इंटरलॉक, बॅरियर) पुरवणे पुरवठादारांनी आवश्यक आहे.

**6. स्वच्छता आणि घरे.** कामगारांना स्वच्छ शौचालय सुविधा आणि पिण्यायोग्य पाणी उपलब्ध असणे आवश्यक आहे.. पुरवठादार कॅन्टिन किंवा भोजनासाठी वेगळी जागा देत असल्यास, त्यात स्वच्छ अन्न तयार करणे, स्वच्छ साठवण आणि खाण्याच्या स्वच्छ सुविधा असणे आवश्यक आहे. पुरवठादार त्यांच्या कामगारांसाठी निवासी सुविधा देत असल्यास, त्यांनी स्वच्छ आणि सुरक्षित निवास व्यवस्था उपलब्ध करून दिली पाहिजे. अशा निवासी सुविधा फायर अलार्म, आगीचा पत्ता लावणे आणि सप्रेशन उपकरणाने सुसज्ज असणे आवश्यक आहे आणि कामगारांना आपत्कालीन स्थिती, वाजवी आणि सुरक्षित वैयक्तिक जागा, प्रवेश आणि निर्गमन सुविधा, आंघोळीसाठी गरम पाण्याची व्यवस्थित सोय, पुरेसा सूर्यप्रकाश आणि खेळती हवा व कामाच्या ठिकाणी पोहोचण्यासाठी आणि तेथून येण्यासाठी योग्य वाहतूक सुविधा (पायी पोहोचता येण्यासारखे नसल्यास) द्यायला हवी.

## पर्यावरण

**1. पर्यावरण.** पुरवठादारांनी लागू पर्यावरणीय कायद्यांचे पालन करणे आवश्यक आहे; आम्ही आमच्या पुरवठादारांना नियामक अनुपालन जबाबदाऱ्यांच्या पलीकडे जाण्यास आणि त्यांच्या संपूर्ण ऑपरेशन्समध्ये अश्या शाश्वत पद्धतींचे एकत्रीकरण करण्याच्या दिशेने प्रगती करण्यास प्रोत्साहित करतो. त्यांच्या संपूर्ण ऑपरेशन्समध्ये आम्ही आमच्या पुरवठादारांना असे मार्ग शोधण्यासाठी प्रोत्साहन देतो ज्यांनी त्यांच्या संपूर्ण कामामध्ये पर्यावरणावर (ऊर्जेचा वापर, हवेचे उत्सर्जन, ग्रीनहाऊस गॅस उत्सर्जन, कचरा, पाणी, प्रदुषण, धोकादायक मटेरिअल आणि रिसायकलिंग) कमीत - कमी प्रभाव पडेल.

**2. ऊर्जेचा वापर आणि ग्रीनहाऊस गॅस उत्सर्जन.** आम्ही पुरवठादारांना ऊर्जा कार्यक्षमता सुधारण्याचे, ऊर्जेचा वापर कमी करण्याचे आणि ग्रीनहाऊस गॅस उत्सर्जन कमी करण्याचे पर्याय शोधण्यासाठी प्रोत्साहन देतो.

**3. पर्यावरणीय परवानग्या व रेकॉर्डकिपिंग.** पुरवठादारांनी आवश्यक सर्व पर्यावरणीय परवाने, मंजुऱ्या आणि नोंदण्या मिळवणे आणि जपून ठेवणे व लागू ऑपरेशनल आणि रिपोर्टिंग तरतुदींना फॉलो करणे आवश्यक आहे.

**4. घातक पदार्थांचे प्रभावी व्यवस्थापन आणि विल्हेवाट लावणे.** पुरवठादारांना पर्यावरणाला धोका पोहोचवणारी रसायने आणि पदार्थांची सुरक्षित हाताळणी, हालचाल, साठवण आणि विल्हेवाट प्रभावीपणे टिपणे आणि त्यांचे व्यवस्थापन करणे आवश्यक आहे, आणि कामगारांना अश्या पदार्थांची सुरक्षित हाताळणी आणि घातक पदार्थांच्या विल्हेवाट लावण्याबाबत योग्य प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. पुरवठादारांनी लागू कायद्यांनुसार विल्हेवाट लावण्यापूर्वी कामादरम्यान तयार होणारे सांडपाणी किंवा घन कचऱ्याचे निरीक्षण करणे आणि त्यावर नियंत्रण ठेवणे देखील आवश्यक आहे.

याव्यतिरिक्त, लागू कायद्यांनुसार परवानगी देण्यात आलेल्या हवाई उत्सर्जनाचे, डिस्चार्ज करण्यापूर्वी, पुरवठादारांनी त्याचे वर्गीकरण, देखरेख, नियंत्रण आणि उपचार करणे आवश्यक आहे.

**प्रदूषण प्रतिबंध आणि संसाधन कपात:** जेव्हा शक्य असेल, तेव्हा पुरवठादारांनी अशुद्ध हवेचे उत्सर्जन, प्रदूषकांचा स्त्राव आणि कचरा निर्मिती कमी करण्याच्या संधी शोधल्या पाहिजेत. आम्ही पुरवठादारांना नैसर्गिक संसाधनांचा जसे पाणी, जीवाश्म इंधन, खनिजे आणि व्हर्जिन वन उत्पादने इत्यादी ह्यांचा वापर कमी करण्याच्या संधी ओळखण्यासाठी प्रोत्साहित करतो.

**पाण्याचे व्यवस्थापन:** आम्ही पुरवठादारांना कायद्यानुसार जल व्यवस्थापन कार्यक्रम कार्यान्वित करण्याच्या संधी शोधण्यास आणि कायद्यानुसार त्याचा डिस्चार्ज किंवा विल्हेवाट लावण्यापूर्वी सर्व सांडपाणी ओळखण्यास, त्याची देखरेख करण्यास , त्यास नियंत्रित करण्यास आणि त्याचा उपचार करण्यास प्रोत्साहित करतो.

**घन कचरा:** पुरवठादारांनी घनकचरा ओळखणे, व्यवस्थापित करणे आणि जबाबदारीने विल्हेवाट लावण्यासाठी किंवा पुनर्वापर करण्यासाठी एक पद्धतशीर दृष्टीकोनाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. आम्ही पुरवठादारांना त्यांच्या संपूर्ण ऑपरेशन्समध्ये लँडफिलच्या ठिकाणी कचरा कमी करण्याच्या संधी शोधण्यासाठी प्रोत्साहित करतो.

**वायूचे उत्सर्जन:** पुरवठादारांनी वायूच्या उत्सराजनापूर्वी कायदयानुसार वायूरूपी ऑरगॅनिक रसायने, एरोसोल, गंज चढवणारी प्रदूषके, हवेतील कण, ओझोनचा स्तर कमी करणारी रसायने आणि कामामधून जनरेट झालेल्या बाय-प्रॉडक्टचे ज्वलन होऊन हवेतून होणारे उत्सर्जन ओळखायला हवे, नियमितपणे निरीक्षण करायला हवे, त्यावर नियंत्रण ठेवायला हवे आणि त्यास हाताळायला हवे. Amazon च्या विनंतीनुसार, हवेतील अशा सर्व उत्सर्जन नियंत्रण यंत्रणा योग्यप्रकारे काम करीत असल्याचे पुरवठादारांनी दाखवून देणे आवश्यक आहे.

## झुंजी खनिजे आणि जमीन अधिकार

**1. झुंजी खनिजे.** Amazon काँगोच्या लोकशाही प्रजासत्ताक किंवा आसपासच्या देशामध्ये संघर्ष वाढवणाऱ्या खनिजांचा वापर टाळण्यासाठी वचनबद्ध आहे. आम्ही आशा करतो की पुरवठादार आमच्या उत्पादनांमध्ये वापरल्या गेलेल्या नियुक्त खनिजांचे मूळ ओळखण्यासाठी आमच्या प्रयत्नांना सहयोग देतील.

**2. जमिनीचे हक्क.** आमच्या साठी हे महत्त्वाचे आहे की आमच्या पुरवठेदारानी व्यक्ती, मूळ लोक आणि स्थानिक समुदायाच्या जमिनीच्या कायदेशीर हक्कांचा आदर करावा. Amazon च्या विनंतीनुसार, पुरवठादार आणि उत्पादकांना जमीन वापरण्याचा कायदेशीर अधिकार दाखवणे आवश्यक आहे. कृषी आणि वनजमिनीच्या घडामोडी आणि त्याचे अधिग्रहण “बाधितांच्या कुठल्या ही दबावाशिवाय, अग्रिम आणि माहितीपूर्ण संमतीच्या” अधीन आहेत ज्यात स्थानिक समुदाय, महिला किंवा स्थानिक लोक आणि इतर उपेक्षित भागधारकांचा समावेश आहे.

## नैतिक वागणूक

**1. लाचखोरी ला नकार.** आमच्या पुरवठादारांनी सरकारी अधिकारी किंवा खाजगी क्षेत्राशी व्यवहार करत असताना कोणत्याही कारणास्तव कोणाबरोबरही लाचखोरी करू नये. यात कोणत्याही कारणास्तव कोणालाही अनावश्यक किंवा अयोग्य फायदे मिळवण्यासाठी किंवा देण्यासाठी कोणत्याही किमतीची ऑफर करणे, वचन देणे, काहीही देणे किंवा स्वीकारणे समाविष्ट आहे. आमच्या पुरवठादारांनी Amazon कर्मचार्यांना आमच्या व्यवसाय आचारसंहिता आणि नीती चे उल्लंघन करायला लावू नये.

**2. भ्रष्टाचारविरोधी).** पुरवठादारांनी यूनायटेड स्टेट्स फॉरिन करप्ट प्रॅक्टिस ॲक्ट आणि यूनायटेट किंग्डम ब्रायबरी ॲक्टसह लागू भ्रष्टाचार-विरोधी कायद्यांचे अनुपालन करायला हवे आणि Amazon च्या वतीने शासकीय अधिकाऱ्यांना लाच देऊ नये. पुरवठादारांनी शासकीय अधिकाऱ्यांना अयोग्य कृती करण्यासाठी त्यांना रिवॉर्ड देऊन प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कोणत्याही स्वरुपातील मोबदला ऑफर करता कामा नये, आणि तसे करण्यासाठी आश्वासन देऊ नये. निषिद्ध देयके अनेक फॉर्म घेऊ शकतात, ती रोख किंवा रोख रकमे-एव्हढे व समतुल्य, भेटवस्तू, जेवण आणि मनोरंजन यापुरते मर्यादित नाहीत. या तरतुदीच्या लागूतेबद्दल कोणतेही प्रश्न किंवा याला अपवादाबद्दल शंका असल्यास अॅमेझॉनच्या कायदेशीर विभागाकडे निर्देशित करणे आवश्यक आहे.

**3. तक्रार यंत्रणा आणि व्हिसलब्लोअर संरक्षण.** अॅमेझॉनला पुरवठादारांनी कामगार व्हिसलब्लोअरचे संरक्षण करण्याची आणि त्यांची गोपनीयता राखण्याची अपेक्षा आहे आणि कामाच्या ठिकाणी तक्रारी नोंदविणार्या कामगारांविरूद्ध सूड घेण्यास मनाई आहे. पुरवठादारांनी कामगारांना त्यांच्या तक्रारी गोपनीय आणि निनावी पद्धतीने सादर करण्यासाठी आणि कामगारांच्या समस्यांविषयी चौकशी आणि निराकरण करण्यासाठी प्रभावी प्रक्रिया राखण्यासाठी एक यंत्रणा तयार करणे आवश्यक आहे. उपकंत्राटदारांनी नियुक्त केलेल्या कामगारांना त्यांच्या समस्या सबकॉन्ट्रॅक्टरच्या वरच्या "व्यवस्थापन स्तरापर्यंत" आणण्यासाठी एक यंत्रणा असणे आवश्यक आहे.

**4. पारदर्शकता.** पुरवठादारांनी कामाच्या अटींबद्दल (उदा., पगार आणि कामाच्या तासाचे रेकॉर्ड) पूर्ण व अचूक रेकॉर्ड ठेवण्याची आणि व्यवस्थापित करण्याची Amazon अपेक्षा करते. पुरवठेदारच्या कामगारांबद्दल , त्यांच्या आरोग्य आणि सुरक्षेसंबंधी , पर्यावरणाबाबत वापरात असलेल्या प्रक्रियांबद्दल amazon नी मागणी केल्यावर किंवा लागू नियमांतर्गत ह्या पुरवठादार आचारसंहिते आणि मानकांचे अनुपालन होत आहे हे दर्शविणारी माहिती पुरवठेदारनी पुरवणे बाध्य आहे. Amazon पुरवठा श्रृंखलेत सरावांचे किंवा अटी रेकॉर्ड खोटे दाखवणे किंवा चुकीचे वर्णन करणे सहन करणार नाही.

## व्यवस्थापन सिस्टम

**1. व्यवस्थापन सिस्टम.** पुरवठादारांनी सतत सुधारणा होण्यासाठी आणि लागू कायदे आणि या पुरवठा कोडसह अंमलबजावणीची खात्री करण्यासाठी एक योग्य व्यवस्थापन सिस्टम अंगिकारावी

अशी Amazon अपेक्षा करते.

**व्यवस्थापन उत्तरदायित्व आणि जबाबदारी.** आमच्या पुरवठादारांनी लागू कायदे तसेच या पुरवठा कोडचे अनुपालन केले जात आहे की नाही हे पाहण्यासाठी व्यवस्थापन सिस्टम आणि प्रोग्रामची अंमलबजावणी करण्यासाठी जबाबदार प्रतिनिधी नेमावा अशी Amazon अपेक्षा करते. वरिष्ठ व्यवस्थापनाने नियमितपणे व्यवस्थापन सिस्टम आणि प्रोग्रामची गुणवत्त्वा आणि प्रभावीपणाचे पुनरावलोकन आणि मूल्यांकन करायला हवे.

**जोखीम व्यवस्थापन.** पुरवठादारांनी त्यांच्या ऑपरेशनल आणि कामगार सरावांशी संबंधित पर्यावरणीय, आरोग्य, सुरक्षा आणि नैतिक जोखिमे ओळखण्यासाठी प्रक्रिया प्रस्थापित करण्याची Amazon अपेक्षा करते. या व्यतिरिक्त, व्यवस्थापनाने ओळखलेली जोखिमे नियंत्रित करण्यासाठी आणि नियामक मान्यतेची खात्री करण्यासाठी योग्य प्रक्रिया विकसित करायला हवी. पुरवठादारांना त्यांच्या स्वत:च्या कामामध्ये, पुरवठा श्रृंखलेत आणि उपकंत्राटदारांमध्ये या मानकांचे सातत्याने निरीक्षण करणे आणि अंमलबजावणी करणे आवश्यक आहे आणि आमच्या पुरवठा कोडमध्ये प्रतिबिंबित झाल्यानुसार आमच्या अपेक्षा आणि आमच्या ग्राहकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी किंवा त्यापेक्षा जास्त सुधारणा केल्या पाहिजेत. महिला, स्थलांतरित कामगार आणि स्वदेशी लोकांसह असुरक्षित गटांकरिता असलेल्या विशिष्ट जोखमींच्या निरंतर मूल्यांकन करण्यास आम्ही आमच्या पुरवठादारांना प्रोत्साहित करतो.

**2. प्रशिक्षण.** आमच्या पुरवठा कोडमधील मानकांची व्यवस्थापक आणि कामगारांनी अंमलबजावणी करण्यासाठी आणि लागू कायदेशीर आवश्यकतांचे अनुपालन करण्यासाठी आमच्या पुरवठादारांनी योग्य प्रशिक्षण प्रोग्राम व्यवस्थापित करावेत अशी Amazon अपेक्षा करते.

**3. संवाद आणि कर्मचारी फीडबॅक.** अॅमेझॉनला अशी अपेक्षा आहे की आमचे पुरवठादार अॅमेझॉनच्या धोरणे, पद्धती आणि अपेक्षांबद्दल कामगारांशी स्पष्टपणे आणि अचूकपणे संवाद साधतील आणि त्यांना हे नीट शिकवतील. अॅमेझॉन कामगारांचे हक्क आणि जबाबदाऱ्या समजून घेणे आणि कामगार-व्यवस्थापनाद्वारे त्यांना अर्थपूर्णरित्या गुंतवून ठेवण्याबद्दल पुरवठादारांना मूल्यांकन करण्यासाठी प्रक्रिया कार्यान्वित करण्यास समित्या किंवा तत्सम मंच बनवण्यास प्रोत्साहित करते. कामगारांना समजेल अश्या त्यांच्या स्थानिक भाषेत भाषांतरित करून व त्यांना सहजरीत्या ज्या ठिकाणाहून ह्या सामग्रीपर्यंत पोहोचता येईल अशा ठिकाणी शेक्षणिक सामग्री ठेवण्यात यावी असे निर्देश Amazon देऊ शकते आणि कामगारांना काही ठळक मुद्यांसंबंधी जोखमेबद्दल सूचना देणे तसेच कामगारांना त्यांच्या हक्कासंबंधी सूचना किंवा प्रशिक्षण देणे ह्या बाबतीत ही Amazon पुरवठेदाराना बाध्य करू शकते. पुरवठादारांनी निरक्षरतेच्या समस्यांबाबत जागरूक असले पाहिजे, आणि प्रशिक्षण देताना याबाबींचा विचार केला गेला आहे याची खात्री केली पाहिजे.

**4. दस्तऐवजीकरण आणि रेकॉर्ड.** पुरवठादारांनी गोपनीयतेचे संरक्षण करण्यासाठी योग्य अश्या गोपनीयते चे पालन करीत लागू कायदेशीर आवश्यकतांसह संपूर्ण अनुपालन करून व्यवसाय रेकॉर्ड तयार करायला हवेत, राखून ठेवायला हवेत आणि त्यांची विल्हेवाट लावायला हवी. वेगवेगळ्या Offices , फॅक्टरीत किंवा इतरत्र योग्य व्यवसाय परवाने ठेवायला हवेत; पुरवठादार सर्व कायदेशीर आवश्यकतांचे पुनरावलोकन करण्यासाठी आणि अनुपालन करण्यासाठी व ऑपरेट करण्यासाठी आवश्यक परमिट, परवाने (उदा. आरोग्य आणि सुरक्षा परवाने, ऑक्युपंसी परमिट, इ.) उपलब्ध करून देण्यासाठी जबाबदार आहेत.